पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रांची मंजूर विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) करण्याकरिता उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद कार्यालय तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांसह पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे येथे स्थलांतरित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.विघयो-३८१६/७५७/प्र.क्र.१९१/नवि-२७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
चौथा मजला, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ११ एप्रिल , २०१८.

संदर्भ :-

१. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.टिपीव्ही-२३१०/८७०/प्र.क्र.२२४/१०/नवि-२७, दि.१३.०१.२०११.
२. आयुक्त, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांचे पत्र क्र.नरवि/ कावि/ १५/ ९१/ २०१५, दि.२३.०६.२०१५.
३. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.वि.यो.पिंपरी-चिंचवड/ अर्थसंकल्प/२३५३, दि.३०.०४.२०१६.
४. शासन निर्णय क्र.विघयो-३८१६/७५७/प्र.क्र.१९१/नवि-२७, **दिनांक : २८ मार्च, २०१८.**

प्रस्तावना :-

आयुक्त पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे संदर्भाधिन दि.२३.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रांची मंजूर विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) करण्याकरिता उप संचालक, नगर रचना यांच्या अधिपत्याखालील १८ अस्थायी पदांचे विकास योजना विशेष घटक कार्यालय "पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटक" या अभिनामाने स्थापन करण्याची विनंती केलेली आहे. या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण मंजूर विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) करण्याकरिता उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद कार्यालय तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांसह पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे येथे स्थलांतरित करण्यास संचालक, नगर रचना, पुणे यांनी संदर्भाधिन दि.३०.०४.२०१६ व दि.३०.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती शिफारस केलेली आहे. सदर विनंतीचा विचार करून शासनाने समक्रमांकाच्या दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर स्थलांतरित करावयाच्या विशेष घटकाकडून पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण या दोन्ही क्षेत्राची विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) सुधारित करणे आश्यक असल्याने समक्रमांकाच्या दिनांक २८ मार्च २०१८ च्या शासन निर्णय (संदर्भ क्र-४) अधिक्रमित करून शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

१. पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्रांची मंजूर विकास योजना सुधारित (दुसऱ्यांदा) करण्याकरिता उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद कार्यालय खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या १५ अस्थायी पदांसह व कार्यरत कर्मचाऱ्यांसह पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे येथे स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	पदांचे नांव	सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनसंरचना (रुपयात)	ग्रेड वेतन रुपयात	एकूण पदे
१	उप संचालक, नगर रचना (राजपत्रित / गट-अ)	रु.१५६००-३९१००	७६००	१
२	नगर रचनाकार (राजपत्रित / गट-अ)	रु.१५६००-३९१००	५४००	१
३	सहाय्यक नगर रचनाकार (राजपत्रित / गट-ब)	रु.९३००-३४८००	४४००	२
४	रचना सहायक	(i) रु.९३००-३४८००	४३००	३
		(ii) रु.९३००-३४८०० (५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर सहाय्यक नगर रचनाकार)	४४००	
५	कनिष्ठ आरेखक	(i) रु.५२००-२०२००	२४००	२
		(ii) रु.९३००-३४८०० (५ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर)	४२००	
६	अनुरेखक	रु.५२००-२०२०० रु.५२००-२०२०० (७ वर्षाच्या अर्हताकारी सेवेनंतर)	२००० २४००	२
७	उच्चश्रेणी लघुलेखक	रु.९३००-३४८००	४४००	१
८	वरिष्ठ लिपिक	रु.५२००-२०२००	२४००	१
९	कनिष्ठ लिपिक	रु.५२००-२०२००	१९००	१
१०	शिपाई	रु.४४००-७४४०	१३००	१
			एकूण :-	**१५**

०२. सदर स्थलांतरित विकास योजना, विशेष घटक कार्यालय "पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण घटक" या अभिनामाने पिंपरी- चिंचवड महानगर पालिका, पिंपरी (पुणे) येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०३. सदरचे कार्यालय या आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आत कार्यान्वित करण्यात यावे.

०४. उक्त घटकातील अधिकारी / कर्मचाऱ्यांचे अनुज्ञेय वेतन व भत्ते तसेच आस्थापना खर्च (कार्यालयीन वाहन, दूरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इत्यादी.) प्रथमत: खालील नमूद लेखाशिर्षातून संचालक नगर रचना व मूल्य निर्धारण यांनी करुन, वर्ष समाप्तीनंतर त्याची प्रतिपूर्ती पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेने करावी. पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेने त्यापैकी ५० टक्के रक्कम पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण यांचेकडून परस्पर सांमजस्याने वसूल करुन घ्यावी,

मागणी क्रमांक :- एफ-२

प्रधानशिर्ष : २२१७ -नगर विकास विभाग
८० - सर्वसाधारण
०१ - संचालन व प्रशासन
(००) (०४) महानगरपालिका/नगरपालिका यासाठी नगर रचना आस्थापना
(२२१७०१४५) (योजनेतर) (दत्तमत)

०५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक **क्र. २०१८०४११११८५५२७२५** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Vishnu Shripati Patil

Digitally signed by Vishnu Shripati Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=21ebe4508a75a767041512feeaa6b8f2d5bc8caf857fe02cd29ce4bbb772da09, serialNumber=f8a0fc598f692587efafe9bd62df9e449fdf81c803c27adf1782c97c76ebcba5, cn=Vishnu Shripati Patil
Date: 2018.04.11 16:53:52 +05'30'

(विष्णू पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२, नागपूर.
२. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
३. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद / पुणे.
५. आयुक्त,औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.
६. आयुक्त, पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१८.
७. संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे. **(०५ प्रतींसह).**
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे-४११ ०४४.
९. संचालक, नगर रचना व सह सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सह संचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
११. सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

१२. उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद.

१३. उप संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड, नवनगर विकास प्राधिकरण घटक, पिंपरी, पुणे.

१४. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद / पुणे.

१५. कक्ष अधिकारी (नवि-२२ / नवि-२५), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. निवडनस्ती / नवि-२७.

*****